राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना
आरोग्य ओळखपत्र वितरण

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
शासन निर्णय क्र. रागांयो-२०१२/प्र.क्र. १६/आरोग्य-६
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ ,
दिनांक :- ३ मार्च, २०१२

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राज्यातील दारिद्रय रेषेखालील व दारिद्रय रेषेवरील कुटुंबांसाठी विमा कंपनीच्या सहभागाने राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सदर योजनेतील लाभार्थी कुटुंबास सदर कुटुंबाचे एकत्रित छायाचित्र व तपशिल असलेले आरोग्य ओळख पत्र देणे प्रस्तावित आहे. सदर ओळखपत्र वितरित करण्यासाठी मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्ह्यांसाठी नियंत्रक शिधावाटप, मुंबई यांच्या नियंत्रणाखालील अधिकाऱ्यांना "आरोग्य ओळखपत्र वितरण अधिकारी" म्हणून प्राधिकृत करण्याचे अधिकारी नियंत्रक शिधावाटप मुंबई यांना प्रदान करण्यात येत आहेत. आरोग्य ओळखपत्राचे वितरण करण्यासाठी वॉर्ड निहाय अथवा स्वस्त धान्य दुकान निहाय चमूची स्थापना करण्यात येईल. अशा प्रत्येक चमूमध्ये मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याचा एक व नियंत्रक, शिधावाटप यांच्या कार्यालयातील एका कर्मचाऱ्याचा समावेश असेल.

प्राधिकृत अधिकाऱ्यांनी स्वत:ची कर्तव्ये सांभाळून आरोग्य ओळखपत्र वितरण करण्याचे काम मुख्य कार्यकारी अधिकारी, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना यांच्या निर्देशानुसार करणे आवश्यक आहे. आरोग्य ओळखपत्रांसदर्भात कोणताही वाद उद्‌भवल्यास त्याबाबतचा अंतिम निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना यांचा असेल. या सोबत असेही नमूद करण्यात येते की, आरोग्य ओळखपत्राची कायदेशीर व अनुषंगीक जबाबदारी ही राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटीची असेल.

आरोग्य ओळखपत्र वितरण करण्यासाठी आरोग्य ओळखपत्रे, प्रशिक्षण, प्रशिक्षण सामुग्री व प्रोत्साहन भत्ता राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटीकडून देण्यात येईल.

हा शासन निर्णय अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३६३/नापु-२८, दिनांक २९ फेब्रुवारी, २०१२ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( अ.सं. फडतरे )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री, आरोग्य यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री, आरोग्य यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई
प्रधान सचिव, वित्त विभाग/ नियोजन विभाग/ विधी व न्याय विभाग / अन्न व नागरी पुरवठा विभाग/माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका मुंबई
मुख्य कार्यकारी अधिकारी, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, मुंबई
संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
जिल्हाधिकारी मुंबई शहर व मुंबई उपनगर
नियंत्रक शिधावाटप, मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, नॅशनल इन्शुरन्स कंपनी लि.
निवड नस्ती